N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** कंधार

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0283 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**16/09/2023 05:58

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 15/09/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/09/2023
   **Time From (वेळेपासून):** 18:15 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 16/09/2023 **Time (वेळ):** 05:09 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/09/2023 05:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महाराणा प्रताप चौक, कंधार ,कंधार

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री रविकुमार प्रेमचंद पौळ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आंबेडकर चौक, सिडको नांदेड ,नांदेड,नांदेड ग्रामीण,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आंबेडकर चौक, सिडको नांदेड ,नांदेड,नांदेड ग्रामीण,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9049031929

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री बळीराम बालाजी पवार | | | 1. मुक्ताई नगर कंधार,कंधार,कंधार, नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्रीसुनिलदत्त विठ्ठलराव खिराडे | | | 1. भारत नगर सोमेश कलनीजवळ, नांदेड,नांदेड,वजीराबाद,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक:- 16/09/2023
फिर्यादी जबाब

मी श्री रविकुमार प्रेमचंद पौळ, वय 36 वर्ष, व्यवसाय मुख्याध्यापक, (निलंबित), रा. प्लॉट नं. 111 एम.एफ. होंडा शोरूमच्या मागे, आंबेडकर चैक, सिडको नांदेड जि. नांदेड मो.क्र 9049031929.
समक्ष पोलीस स्टेशन कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे राहणारा असुन दिनांक 14/09/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे समक्ष जावुन तक्रार दिली की, मी भारतीय शिक्षण प्रसारक मंडळ समर्थ नगर धनेगांव संचलित विदयाभवन प्राथमिक शाळा धनेगांव येथे मुख्याध्यापक म्हणुन कार्यरत होतो. प्रशासकिय कारणांमुळे आमच्या संस्थेच्या कार्यकारणीने मला दि. 01/07/2023 पासुन निलंबीत केले आहे. आमचे संस्थाचालक बळीराम बालाजी पवार यांच्या दोन सेवाभावी संस्था असुन एका संस्थेअंतर्गत विदया भवन प्राथमिक शाळा धनेगांव, नांदेड व दुस-या संस्थेअंतर्गत लोकमान्य प्राथमिक शाळा कंधार ही आहे. त्या शाळेतील शिक्षक श्री खिराडे हे मला नांदेड येथे भेटुन त्यांनी मला सांगीतले की, तुमचे निलंबनाचे प्रकरण मिटवुन घ्या, प्रकरण मिटवायचे असेल व निलंबन रद्द करणे, निलंबन कालावधी नियमित करणे इतर काम करून देतो पण त्यासाठी 2,00,000/- रूपये व तिन महिण्याची जी पगार निघेल त्यामधील अर्धी पगार दया असा निरोप बळीराम पवार सरांनी दिलेला आहे. असे सांगुन माझेकडे खिराडे सर मार्फत लाचेची मागणी केली आहे व मी दि. 15/09/23 रोजी बळीराम बालाजी पवार व खिराडे यांना भेटण्यासाठी कंधार येथे जाणार आहे अशा आशयाची तक्रार पोलीस निरीक्षक श्री अविनाश खंदारे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचेकडे दिली होती. सदर तक्रार त्यांनी पंचासमक्ष नोंदविली असुन त्यावर मी, पंच व पो.नि. खंदारे यांनी सहया केल्या आहेत.

मी दि. 15/09/2023 रोजी दिलेल्या तक्रारी वरून दि. 15/09/2023 रोजी कार्यवाही करायची असल्याने मी, सापळा पथक, दोन्ही पंच असे 12.10 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथुन रवाना होवुन कंधार षहराच्या आलीकडे पानभोसी रोडवर 13.18 वा. सुरक्षित ठिकाणी थांबलोत.

त्यानंतर पोनि श्री खंदारे यांनी मला व दोन्ही पंचाना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यानंतर पोनि खंदारे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ ईश्वर जाधव यांनी पोनि श्री खंदारे, माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर पोनि श्री खंदारे यांनी मला लोकसेवक श्री बळीराम बालाजी पवार व सुनिलदत्त विठ्ठलराव खिराडे कुठे भेटतील याबाबत विचारणा केली असता मी त्यांना सांगीतले की, दोघेही लोकमान्य प्राथमिक शाळा कंधार येथे भेटतील. तेव्हा मला व पंच क्र. 01 गजानन मोरे यांचे सोबत दोन्ही लोकसेवक यांचे संस्था मध्ये पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय पोनि श्री खंदारे यांनी घेतला. त्यानंतर माझे जवळ डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन मला व माझे सोबत पंच क्रमांक 1 श्री गजानन मोरे यांना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी पानभोसी रोड कंधार येथून 13:46 वा माझे चार चाकी वाहनाने रवाना केले.त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे लोकमान्य प्राथमिक शाळा कंधार येथे जावून दोन्ही लोकसेवक यांना पाहिले असता तिथे सुनिलदत्त विठ्ठलराव खिराडे हे कार्यालयात हजर होते. त्यांनी मला बोलण्यास सुरवात करून खिराडे यांनी मला माझे निलंबन रद्द करणे, निलंबन कालावधी नियमित करणे इतर काम करून देण्यासाठी 2,00,000/- रूपये व तिन महिण्याची जो पगार निघेल त्यामधील अर्धी पगार दया असे बळीराम पवार सरांनी सांगीतले असे म्हणाल्याने मी काही कमी करा 1,50,000/- रूपयापर्यंत करा असे म्हणालो असता त्यांनी मला समक्ष बळीराम पवार यांचेशीच बोलुन घेवु असे म्हणुन संस्थाअध्यक्ष बळीराम पवार यांना माझे समक्ष फोन लावुन त्यांना मी आल्याचे सांगीतले व संस्थाअध्यक्ष बळीराम पवार यांनी आम्हास त्यांचे लोहा रोडवरील त्यांचे ट्रॅक्टर शोरूमवर येण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही लोकमान्य प्राथमिक शाळा कंधार येथुन माझे चार चाकी वाहनाने मी, पंच व खिराडे सर असे बळीराम पवार यांना भेटण्याकरीता निघालोत. संस्थाअध्यक्ष बळीराम पवार यांची शोरूममध्ये भेट घेतली असता त्यांनी मला म्हणले की, मी कोणाचे



Scanned with CamScanner

काही नुकसान करीत नाही, कोणाच्या पोटावर पाय मारीत नाही. तुमचे निलंबन कालावधी वेतन काढुन देतो, चौकशी दरम्यान तुम्हाला पाहिजे तशी मदत करून देतो, येणा-या एक तारखेला निलंबन बहाल करून शाळेवर रूजु करून घेण्यात येईल असे म्हणुन संस्थाअध्यक्ष बळीराम पवार यांनी मी खिराडे सर यांचेकडे पुर्ण कल्पना दिली आहे. एक तारखेच्या आत तुम्हाला संपुर्ण जमा करावे लागणार आहे असे सांगीतले. त्यानंतर खिराडे सर यांना मी शोरूमच्या बाहेर बोलावुन रक्कमेची विचारणा केली असता पवार सर यांनी दोन मागीतले आहे असे सांगितले त्यावर मी त्यांना दोन लाख रक्कम ही जास्त होत आहे, मी तुम्हाला विनंती केली होती की रक्कम कमी करण्यात यावी, तुम्ही या विषयी पवार सरांना बोलला नाहीत काय? यावर खिराडे यांनी म्हणाले की, मी पवार सरांना दिड लाखावर बसविण्याची विनंती केली, पवार सर काही ऐकत नाहीत व आज रोजी पवार सरांना एक लाख रूपये दयावे लागतील असे म्हणाल्याने यावर मी खिराडे सर यांना माझे कडुन एकुण दिड लाख रूपये देणे होतात, त्यामधील पन्नास हजार रूपये आज रोजी मी देईल असे सांगितलो. त्यावर खिराडे सर हे पवार सरांना विचारणा करून येतो असे म्हणुन गेले. खिराडे सर परत येवुन मला म्हणाले की, आज रोजी एक लाख रूपये व उर्वरित रक्कम दोन दिवसात दयावी लागेल असे म्हणाले असता मी आज रोजी पन्नास हजार रूपये व उर्वरित रक्कम दोन दिवसात देतो असे म्हणालो असता खिराडे सर यांनी मला लगेच पन्नास हजाराची मागणी केली. त्यावर मी पन्नास हजार रूपये माझा पाहुना घेवुन येत आहे मी एका तासात पन्नास हजार रूपये घेवुन येतो असे म्हणालो असता खिराडे सरांनी रक्कम सोबतच आनु नाही का ? असे म्हणले असता त्यावर मी त्यांना मला आज वेळ नव्हता म्हणुन मी रक्कम आणलो नाही एका तासात आणतो असे म्हणालो असता खिराडे सर यांनी लवकर पन्नास हजार रूपये आणुन दया असे सांगीतले. त्यावर खिराडे सर यांनी संस्थाअध्यक्ष पवार सर यांचेकडे जावुन कल्पना देवुन माझे गाडीत येवुन बसले व मी त्यांना महाराणा प्रताप चौकात सोडलो.

त्यानंतर मी व पंच क्र. 1 मिळुन सापळा पथक थांबले ठिकाणी 16:38 वा चे सुमारास परत आलो. तेव्हा पोकॉ ईश्वर जाधव यांनी माझे ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकार्डर घेवुन बंद केले. त्यानंतर पोनि श्री खंदारे यांनी मला शासकीय वाहनाचे बाहेर थांबवुन पंच क्र 1 श्री गजानन मोरे यांना शासकीय वाहनात बसवुन घेवून त्याचेकडे लाचमागणी पडताळणी अनुशंगाने विचारपुस केली. त्यानंतर मला शासकीय वाहनात बोलवुन घेवुन दोन पंचासमक्ष माझेकडे लाचमागणी पडताळणी दरम्यान घडलेल्या घटनेची विचारपुस केली. त्यानंतर पो.नि. श्री खंदारे यांनी पोकॉ ईश्वर जाधव यांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करण्यास सांगुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रित झालेले संभाषण दोन्ही पंच, सापळा पथक व पो.नि. खंदारे यांना ऐकले. पंच क्र. 01 व मी सांगितलेली हकिकत तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण यावरून लोकसेवक बळीराम बालाजी पवार संस्थाअध्यक्ष यांनी सुनिलदत्त विठ्ठलराव खिराडे शिक्षक यांचे मार्फत माझे निलंबन कालावधी वेतन काढुन देण्यासाठी, चौकशी दरम्यान मला पाहिजे तशी मदत करण्यासाठी व येणा-या एक तारखेला निलंबन बहाल करून शाळेवर रूजु करून घेण्यासाठी 2,00,000/- रूपये व माझे निलंबन कालावधीतील अर्धे वेतनाची लाचेची मागणी करून 50,000/- रूपये लाचेची रक्कम लगेच आणुन देण्यास सांगीतल्याचे निश्पन्न झाले.

त्यानंतर पो.नि. श्री खंदारे यांनी लोकसेवक यांचे विरूध्द लाचेचा सापळा लावयाचा असल्याचे सांगितले. त्यानंतर सापळा पथक थांबले ठिकाणी शासकीय वाहनात मला, दोन्ही पंचाना सापळा पुर्व कार्यवाहीचा उद्देष सांगितला. पो. नि. श्री खंदारे यांचे सुचनेवरुन पो.ना. राठोड यांनी अँथ्रासिन पावडर चे गुणधर्म व अल्ट्राव्हाईलेट लॅम्प माहिती सांगुन त्याचे प्रात्याक्षीक करुन दाखविले. त्यानंतर पोनि श्री अविनाष खंदारे यांनी सापळा कार्यवाहीचे अनुशंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. तसेच लोकसेवक बालाजी पवार व सुनिलदत्त खिराडे यांनी माझेकडुन अँन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर कोणता ईशारा करायचा ते सांगीतले. तसेच इतर सापळा पुर्व कार्यवाही केली. त्यानंतर माझी अंगझडती घेण्यात आली. त्यानंतर माझेकडील 50,000/- रूपये ज्यात 500 रू. दराच्या 100 चलनी नोटा घेवुन त्यास अँथ्रासिन पावडर लावुन मी माझे अंगात परिधान केलेल्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुचे खिशात ठेवले. त्यादरम्यान सुनिलदत्त खिराडे सर यांचा मला फोन आला व लवकर महाराणा प्रताप चौक कंधार येथे रक्कम घेवुन येण्यास सांगीतले.

त्यावेळी पोनि खंदारे यांचे सुचनेवरुन पोकॉ ईश्वर जाधव यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे गळयात दोरीच्या सहायाने लटकवुन दिले. त्यांनतर मी व पंच क्र. 01 गजानन मोरे असे माझे चार चाकी वाहनाने पानभोसी रोड कंधार येथून 18:01 वाजता रवाना झालो. आमचे पाठीमागे थोडे अंतर राखुन सापळा पथक शासकीय वाहनाने आले. मी व पंच क्र. 01 असे महाराणा प्रताप चैक कंधार येथे पोहचल्यावर मी व पंच क्र.01 श्री मोरे सापळा पथक आल्याने महाराणा प्रताप चौक येथे थांबलो. तिथे लोकसेवक सुनिलदत्त खिराडे सर यांची भेट घेतली त्यांनी मला व पंच क्र. 01 समक्ष 50,000/- रूपयाची मागणी केली असता मी त्यांना पवार सर कोठे आहेत असे विचारले असता त्यांनी मला पवार सरांशी फोन लावुन देवुन बोलु घातले व पवार सरांनी मला खिराडे सरांकडे



Scanned with CamScanner

लाचेची रक्कम देण्यास सांगीतल्याने मी खिराडे सरांनी 50,000/- रूपये दिले. खिराडे सर हे माझे वाहनात बसुन सदर रक्कम मोजत असतांना त्यावेळी लागलीच सापळा पथक माझे चार चाकी वाहणाचे ठिकाणी आले. त्यावेळी सापळा पथकातील पोनि खंदारे यांनी पंच क्रमांक 1 यांना कोणी लाच मागुन स्वीकारली याबाबत विचारण केली. पंच क्रमांक 1 श्री गजानन मोरे यांनी लोकसेवक श्री सुनिलदत्त खिराडे यांचेकडे हाताने इशारा करून दाखविले. त्यावेळी पोना राजेश राठोड यांनी सुनिलदत्त खिराडे यांचे दोन्ही हात मनगटाला पकडून ठेवले. पो.नि. खंदारे यांनी सुनिलदत्त खिराडे यांचे हातातील लाचेची रक्कम पंच क्र. 02 यांचेकडे देवुन खिराडे यांना स्वतःचा परिचय दिला व त्यांचे पुर्ण नाव, गाव याबाबत विचारपुस केली. त्यानंतर सापळा पथकाने त्यांची कार्यवाही करून लोकसेवक सुनिलदत्त खिराडे यांना शासकीय वाहनाने पोलीस स्टेशन कंधार येथे आणले व पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात आली.

तरी लोकसेवक श्री बळीराम बालाजी पवार, वय 42 वर्ष, व्यवसाय नोकरी जि.प. सहशिक्षक व संस्थाअध्यक्ष, रा. मुक्ताई नगर कंधार ता. कंधार जि. नांदेड व श्री सुनिलदत्त विठ्ठलराव खिराडे, वय 52 वर्ष, व्यवसाय नोकरी शिक्षक, रा. भारत नगर सोमेश कॉलनी जवळ, नांदेड यांचे विरुध्द मी दिनांक 15/09/2023 रोजी ला.प्र.वि. नांदेड कार्यालयात दिलेल्या तक्रारी वरून दिनांक 15/09/2023 रोजी लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री सुनिलदत्त विठ्ठलराव खिराडे यांनी बळीराम बालाजी पवार यांचे सांगण्यावरून माझे निलंबन कालावधीतील वेतन काढुन देण्यासाठी, माझे विरूध्द चालु असलेल्या चौकशी दरम्यान मला पाहिजे तशी मदत करण्यासाठी व येणा-या एक तारखेला निलंबन बहाल करून शाळेवर रूजु करून घेण्या करीता त्यांचे आर्थिक गैरफायदयाकरीता पंचा समक्ष 2,00,000/-रूपये व निलंबण कालावधीतील अर्धा पगार अशी लाचेची मागणी करुन दि. 15/09/2023 रोजी 18:15 वा चे सुमारास महाराणा प्रताप चौक, कंधार येथे पहिला हप्ता म्हणुन 50,000 /- रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे. म्हणून लोकसेवक श्री बळीराम बालाजी पवार, वय 42 वर्ष, व्यवसाय जि. प. सहशिक्षक व संस्थाअध्यक्ष, रा. मुक्ताई नगर कंधार ता. कंधार जि. नांदेड व श्री सुनिलदत्त विठ्ठलराव खिराडे, वय 52 वर्ष, व्यवसाय शिक्षक, भारत नगर सोमेश कॉलनी जवळ, नांदेड यांचे विरुध्द योग्य ती कायदेशिर कार्यवाही होणेसाठी माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केला असुन त्याची प्रिंट काढल्यानंतर तो मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.

ही फिर्याद दिली सही

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
GOPAL CHANDRAPAL INDRALE
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): DCPS151010004
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** RAMA SADASHIV PA
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):** POBN53058

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे. ता.कपार जि.नाशिक



Scanned with CamScanner